# वास्तूचे ब्रह्मस्थान

बबनराव पाटील

सूर्याच्या प्रखर किरणांपासून बचाव करणारं तरीही सूर्यप्रकाशानं न्हाऊन निघालेलं, घोंघावणाऱ्या वाऱ्याशी दोन हात करणारं परंतु खेळत्या हवेशी रमणारं, धो धो पावसाला झेलणारं तरीही मंद मृत्तिकागंधाने दरवळणारं अर्थातच ऊन, पाऊस, वारा यांच्यासवे सख्य करणाऱ्या अशा घराची कल्पना सर्वांनाच हवीहवीशी वाटते.

प्राचीन भारतीय वास्तुशास्त्राने पाचही महाभूतांशी समतोल साधून राहणाऱ्या घराकरिता ब्रह्मस्थानाची योजना केली आहे. ब्रह्मस्थान हे open to sky मोकळं असावं, असा संकेत आहे. त्यामागे पाचही तत्त्वांशी सहचर्य साधले जाते.

पूर्वीच्या काळी मोठमोठाल्या वाड्यांमध्ये वाड्याचा मध्यभाग हा मोकळा ठेवला जाई (आकाश महाभूताचे बाहुल्य तेथे राही). या मध्य भागामध्ये कधी तुळशीवृंदावन असे तर कधी या ब्रह्मस्थानाचा उपयोग चर्चा, संवादाकरिता होत असे. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये तर घरातील सर्व व्यक्तींच्या परस्पर सुसंवादाकरिता वाड्याचे मधले ब्रह्मस्थानच साक्षीदार असे. सामान्यतः घरातील मुख्य व्यक्ती किंवा महत्त्वाच्या व्यक्ती ह्या अशा ब्रह्मस्थानाजवळील (ब्रह्मस्थानालगतच्या) ओसरीवर स्थानापन्न होत असत व इतरजण त्याच्याजवळ अथवा ब्रह्मस्थानात बसून सभा, वादविवाद होत असत. जुन्या मराठी चित्रपटांमध्ये तुम्ही आम्ही सगळ्यांनीच ओसरीवरील पाटील व मध्यभागी तक्रारी, प्रश्न घेऊन उभे राहणारे जनसामान्य पाहिलेले आहेतच. आताच्या काळात जागेचा प्रश्नच इतका महत्त्वाचा आहे की ओसरीच काय पण ब्रह्मस्थान उघडे ठेवणेही कठीण असल्यासारखे वाटते.

पूर्वीसारखे वाडे आता राहिलेले नाहीत तरीही ब्रह्मस्थान मोकळे ठेवण्याकरिता धडपड करणे आवश्यक आहे.

एकाशितीपद वास्तुपदमंडळ पाहिले तर लक्षात येतं की वास्तुपुरुषाची जी षण्महन्ति मर्मस्थाने सांगितली आहेत त्यातील हृदय, नाभी, स्तनद्वय ही ब्रह्मस्थानातच येतात. त्या जागी कोणतीही जड वस्तू येऊ नये असा, संकेत आहे (आकृती १)

**एकाशितीपद वास्तुपदरचना व मर्मस्थाने :** जड वस्तू अर्थातच त्यात बांधकामाचा समावेश अग्रक्रमाने होतो.

आता असा संकेत प्राचीन ऋषीमुनींनी का दिला असावा याचा विचार करताना असे जाणवते की पूर्वीचे घर हे निसर्गाशी सख्य करणारे, निसर्गाच्या नियमानुसार आपले रूप धारण करणारे आहे.

पूर्वी विजेचा शोध लागला नसल्याने सर्व व्यवहार हे प्रामुख्याने सूर्यप्रकाशावर व विस्तवावर अवलंबून होते.

**प्रातःकाळी :** सूर्यप्रकाश व उष्णता वास्तूच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण दिशांमध्ये पोहचते. पूर्वेस जरा अधिक प्रमाणात उष्णता व प्रकाश असतो. परंतु या चारही मुख्य दिशांपासून जसजसं आतील बाजूस अर्थात ब्रह्मस्थानापर्यंत जावे तसे प्रकाशाचे प्रमाण कमी कमी होत जाते. कसे ते पाहू.

**दिवसा :** संध्याकाळी पूर्वेच्या मानाने सूर्यकिरणांचा व उष्णतेचा फायदा पश्चिमेस अधिक प्रमाणात होतो व दिवसाच्या परिस्थितीप्रमाणे याही वेळेस मुख्य दिशांपासून जसजसे आतील बाजूस अर्थात ब्रह्मस्थानापर्यंत जावे तसतसे प्रकाशाचे प्रमाण कमी कमी होत जाते. कसे ते पाहू.

**संध्याकाळी :** ब्रह्मस्थान मोकळे ठेवल्याने अधिकाधिक सूर्यप्रकाश तसेच खेळती हवा घरासाठी मिळते.

घरामध्ये पेटणारा विस्तव, घरातील व्यक्तीचे श्वसन, इतर यंत्रसामग्रीमुळे निर्माण होणारी उष्णता, सूर्याच्या तापामुळे भिंती गरम झाल्याने निर्माण होणारी उष्णता यामुळे घरामधील हवेचे तापमान वाढते. ही उष्ण हवा घरामध्ये कोंडून राहते व असह्य होते. थंडाव्याकरिता पंख्यासारख्या उपकरणाचा वापर करूनही उष्ण हवाच मिळते.

ही उष्ण हवा घराबाहेर पडण्यासाठी मार्ग करून दिल्यास घरामध्ये बाहेरून थंड हवेचा शिरकाव होऊन हवा खेळती राहण्यास मदत होते. उष्ण हवा प्रसरण पावल्याने वर जाते. अशा वेळी घराच्या भिंतींच्या वरच्या बाजूस म्हणजेस छताला लागून तावदाने असल्यास उष्ण प्रसरण पावलेली हवा वर जाऊन घराबाहेर पडते व त्या हवेची जागा बाहेरील थंड हवा घरात खिडक्यांवाटे शिरून घेते. अशा वेळी आपण अशी कल्पना करू की घराचे ब्रह्मस्थान मोकळे व open to sky आहे. तर मग उष्ण हवा हलकी होऊन ब्रह्मस्थानावाटे बाहेर जाईल व थंड हवा खिडक्यांवाटे घरात प्रवेश करील. याच्या परिणामस्वरूप घरामध्ये हवा खेळती राहण्यास मदत होईल.

जी गोष्ट खेळत्या हवेची तीच परिस्थिती प्रकाशाच्या बाबतीतही खरी आहे.

ब्रह्मस्थान मोकळे नसणाऱ्या घरातील प्रकाशव्यवस्था व ब्रह्मस्थान मोकळे असणाऱ्या घरातील प्रकाशाचा खेळ याचा आता विचार करू.

घराच्या चारही दिशा मोकळ्या म्हणजेस अन्य कुणा घराच्या भिंतीस लागून नसल्यास व ब्रह्मस्थान मोकळे नसेल तर पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या चारही दिशांनजीक सकाळ, दुपार, संध्याकाळी प्रकाश राहील परंतु घराच्या बाह्य भिंतीपासून जसजसे आत आत म्हणजेच ब्रह्मस्थानाकडे आपला मोर्चा वळेल तसतसा प्रकाशातून अंधाराकडे प्रवास होत जातो व सरतेशेवटी ब्रह्मस्थानी तर अंधाराचे साम्राज्य अनुभवास येते. पुढील आकृतीवरून हे सहज लक्षात येईल की ब्रह्मस्थान open to sky नसेल तर काय आपत्ती ओढवेल.

या विरुद्ध आपण ब्रह्मस्थान मोकळे अथवा open to sky ठेवल्याने काय फायदा मिळतो ते पाहू.

सकाळी चारही मोकळ्या मुख्य दिशांजवळील खोल्यांमध्ये प्रकाश पोहचणारच परंतु मोकळ्या ब्रह्मस्थानामुळे प्रकाशकिरणे ब्रह्मस्थानापर्यंत व ब्रह्मस्थानाजवळील खोल्यांमध्येही पसरतात. आकृतीवरून सहजच स्पष्ट होते की जवळ जवळ चारही दिशांकडील प्रत्येक खोलीमध्ये प्रकाशकिरणांची घौडदौड होते व ब्रह्मस्थानानजीकच्या खोल्याही प्रकाशाने उजळून निघतात. मोकळ्या ब्रह्मस्थानामुळे जवळ जवळ संपूर्ण वास्तूच प्रकाशमय होते.

संध्याकाळी सूर्य पश्चिम क्षितिजावर असताना पूर्व-पश्चिमादी चार दिशांनजीकच्या खोल्यांप्रमाणेच ब्रह्मस्थानातून प्रकाशकिरणे ब्रह्मस्थानालगतच्या खोल्यांमध्ये पसरतात व मध्यभागाबरोबरच त्या खोल्याही मावळत्या सूर्यकिरणांनी सुखावतात. (आकृती)

वरील चर्चेवरून हे सहज स्पष्ट होते की ब्रह्मस्थान open to sky ठेवण्यामागे निसर्गाशी सख्य करण्याचाच विचार दडला आहे.

ब्रह्मस्थान open to sky ठेवणे सर्वच घरांच्या बाबतीत शक्य होणारे नाही. लहान घरे किंवा फ्लॅट्समध्ये ज्यांना एका दिशेच्या भिंतीस खिडक्यांची व्यवस्था असते तेथे वरील प्रकारे ब्रह्मस्थानाची व्यवस्था करणे शक्य नसते व त्याची आवश्यकताही भासत नाही. कारण मोकळ्या खिडक्यांमधून येणारा प्रकाश व हवा घराकरिता पुरेशी असते. अशा घरांमध्ये ब्रह्मस्थानाची रचना कशी असावी ?

सामान्यतः अशा छोट्या घरांमध्ये जेथे हवा व प्रकाशाचा प्रश्न उद्भवत नाही अशा घरांकरिता ब्रह्मस्थानामध्ये अवजड वस्तू, स्तंभ, पिलर्स, कपाटे मोठमोठाली यंत्रे अशा अवजड वस्तू ठेवू नयेत असा संकेत आहे. अर्थातच अशा वस्तू भिंतीनजीक गेल्याने ब्रह्मस्थान मोकळे राहते. याचा शुभ परिणाम ऊर्जेच्या मंडलाकार संवहनास होतो व अधिकाधिक शुभ ऊर्जेचा वास्तूस लाभ मिळतो.

ब्रह्मस्थानात खड्डा, पाणी असू नये. अन्यथा अनर्थ उद्भवतो. ब्रह्मस्थान स्वच्छ व पवित्र असावे.

गृहमध्येकृतं स्तम्भं ब्रह्मणोवेधमुच्यते ।

ब्रह्मस्थानी कोणताही वेध असू नये. त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम स्तंभादी असू नये.

ब्रह्मस्थानामध्ये खड्डा, विहीर असणे अनर्थकारक आहे. काही ठिकाणी शोभेकरिता म्हणून वास्तूच्या प्रशस्त मध्यभागी कृत्रिम तलाव, कारंजे याची योजना आढळते, परंतु ते चूक आहे. बोअरवेल-अंडरग्राउंड टँक, विहीर ब्रह्मस्थानी असणे म्हणजे महाअनर्थ होय.

ब्रह्मस्थानी काय असू नये हे सांगितल्यावर तेथे काय असावे किंवा ते कसे ठेवावे हे सांगणेही आलेच.

ब्रह्मस्थान स्वच्छ, पवित्र ठेवावे. ते मोकळेच असणे आवश्यक आहे. परंतु मोकळे व घराच्या मध्यभागी येत असल्याने तेथे चोहोकडून केरकचरा, उष्टावळ, थुंकणे असे प्रकार असू नयेत.

पूर्वीच्या काळच्या इमारतींचे निरीक्षण केल्यास असे आढळते की चारही बाजूंनी इमारती व एकाच मजल्यावरील सर्व घरांच्या दरवाजालगतचा पॅसेज हा सर्वांना कॉमन राहत असे. त्यामुळे मध्यभागाचे मैदान (ब्रह्मस्थान) हे सर्वांकरिता मोकळे राहत असे.

पूर्वीच्या अशा प्रकारच्या इमारती तसेच अनेक जुन्या चाळी ज्या आजही भायखळा, गिरगाव, दादर या भागांमध्ये आढळतात तेथे शेजारधर्म, एकी जास्त प्रमाणात दिसून येते. या ठिकाणी सार्वजनिक उत्सवांकरिता ब्रह्मस्थानाचा वापर सर्रास मोठ्या प्रमाणावर होताना आजही दिसतो व अगदी घराच्या दारामधील मोकळ्या पॅसेजमध्ये उभे राहूनही ब्रह्मस्थानी अर्थात मध्यभागी रंगणाऱ्या कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. सत्यनारायण, नवरात्रौत्सव व असंख्य सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, भाषणे, शिबिरे याकरिता ब्रह्मस्थान हॉल तसेच मैदानाची भूमिका बजावतो.

अशा वेळी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने ब्रह्मस्थान म्हणजे एक प्रकारचे वरदानच ठरते.

ब्रह्मस्थान open to sky ठेवल्याने त्याबरोबर असुरक्षितताही येतेच. यासाठी उपाय म्हणजे तेथे पारदर्शक पिरॅमिडची योजना करावी. त्यायोगे तेथे सरळ रेषेत येणाऱ्या सूर्यकिरणाबरोबरच परावर्तित सूर्यकिरणांमुळे प्रकाशाचे प्रमाणही वाढते.

अशा प्रकारे ब्रह्मस्थानाचा योग्य उपयोग करून निसर्गाशी सुसंवाद साधल्याने शुभ फळे प्राप्त होतात.

- बबनराव पाटील

१, वैष्णव निवास, आकुर्ली क्रॉस रोड नं. २,

कांदिवली (पूर्व),

मुंबई - ४००१०१

संपर्क : ०२२-२८८५२१०८

भ्रमणध्वनी : ९८२१३१८५५२